महाराष्ट्र शासनाचा २००७-२००८ या वर्षाचा
अर्थसंकल्प विधानसभेला सादर करताना

# वित्त मंत्री श्री. जयंत पाटील

यांनी गुरुवार, दिनांक २२ मार्च २००७ रोजी
केलेले भाषण

## भाग दुसरा

**सुधारित अंदाज २००६-०७.** १. मार्च २००६ मध्ये सन २००६-०७ चा अर्थसंकल्प सादर कारताना रु. ८,४७९.०४ कोटींची शिल्लक राहील असा अंदाज व्यक्त केला होता. सुधारित अंदाजात रु. ८९०.३३ कोटींची तूट दिसते. वर्षारंभाची रु. १.४७ कोटींची प्रत्यक्ष शिल्लक हिशेबात घेतल्यास वर्ष अखेरची तूट रु. ८८८.८६ कोटी इतकी राहील.

**अर्थसंकल्पीय अंदाज २००७-०८.** २. सन २००७-०८ च्या अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये पुढे दर्शविल्याप्रमाणे रु. २,०१७.२९ कोटींची शिल्लक राहील असा अंदाज आहे :—

| | (रुपये कोटीत) |
|---|---|
| (अ) महसुली विभाग— | |
| जमा .. .. | ६८,२९८.८८ |
| खर्च .. .. | ६७,७८८.२० |
| शिल्लक .. | ५१०.६८ |
| (ब) भांडवली विभाग— | |
| जमा .. .. | १६,३०२.०६ |
| खर्च .. .. | १७,८४९.१७ |
| तूट .. | १,५४७.११ |
| (क) लोकलेखा (निव्वळ) .. .. | ३,९४२.५८ |
| (ड) एकूण | |
| जमा (अ + ब + क) .. .. | ८८,५४३.५२ |
| खर्च (अ + ब) .. .. | ८५,६३७.३७ |
| शिल्लक .. | २,९०६.१५ |
| सुरूवातीची शिल्लक .. | -८८८.८६ |
| एकूण शिल्लक .. | २,०१७.२९ |

वार्षिक योजना सन २००७-२००८ बाबत योजना आयोगाशी झालेल्या चर्चेच्या आधारे या वर्षाच्या योजनेचे आकारमान रु. २०,२००.०० कोटी निश्चित करण्यात आले आहे. सदर

एकूण नियतव्ययापैकी रु. १८,३३६.३६ कोटी नियतव्यय त्या त्या क्षेत्राखाली अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे, आणि उर्वरित रु. १,८६३.६४ कोटीचा नियतव्यय नियोजन विभागांतर्गत ठोक तरतूद म्हणून अर्थसंकल्पित करण्यात आला आहे.

**मूल्यवर्धित करः प्रगतीचा आढावा.**

**३.** मूल्यवर्धित कराची अंमलबजावणी सुरू होऊन लवकरच दोन वर्षे पूर्ण होतील. तेव्हा नवीन पध्दतीचा परिणाम काय झाला याचा आढावा घेणे रास्त ठरेल. तत्कालीन मुंबई विक्रीकर अधिनियम व मोटार स्पिरीट कर अधिनियम या दोन अधिनियमांखाली २००४-०५ या वर्षी एकंदर रु. १७०१६ कोटी इतका महसूल जमा झाला होता आणि २९६ कोटी रुपयांचे परतावे दिले होते. नवीन पध्दतीच्या पहिल्या वर्षी मेळजुळणीप्रमाणे एकूण रु. १८८७६ कोटी एवढा महसूल जमा झाला होता आणि १६३७ कोटी रुपयांचे परतावे दिले. चालू वर्षी एकूण २३१९९ कोटी रुपयांचा महसूल जमा होईल आणि १९०० कोटी रुपयांचे परतावे दिले जातील, असा अंदाज आहे. दुसऱ्या शब्दात सांगायचे, तर या तीन वर्षांचा निव्वळ जमा महसूल अनुक्रमे १६७२० कोटी, १७२३९ कोटी आणि २१२९९ कोटी रुपये इतका आहे आणि महसूल वाढीचा सरासरी वेग १३% आहे. जुलै आणि ऑगस्ट २००५ मधील अतिवृष्टी व महापूर यांचा विचार केला, तर महसूलवाढीचा वेग समाधानकारक आहे, असेच म्हटले पाहिजे.

**मूल्यवर्धित करापोटी नुकसानभरपाई.**

**४.** नवीन करपध्दतीमुळे झालेल्या महसूलहानीची भरपाई म्हणून आपण केंद्रशासनाकडे पहिल्या वर्षाकरिता रु. ३७०३ कोटींची मागणी केली आहे. त्यापैकी रु. २३७४ कोटी रुपये भरपाईपोटी यापूर्वीच मिळाले आहेत. भरपाईची बाकी रक्कम आहे १,३२९ कोटी रुपये. या रकमेपैकी सुमारे १२०० कोटी रुपये येत्या ३१ मार्च पूर्वी मिळावेत अशी अपेक्षा आहे. २००६-०७ या वर्षासाठीची भरपाई आणि २००७-०८ या वर्षाच्या पहिल्या ९ महिन्यासाठीची भरपाई यापोटी एकत्रित मागणी सुमारे २४००

कोटी रुपयांची होईल. महसूलहानीची भरपाई म्हणून ही रक्कम ३१ मार्च २००८ पर्यंत मिळावी अशी अपेक्षा आहे.

**निर्धारणेसाठी समयमर्यादा.** ५. व्यवसायकर अधिनियम व मोटार स्पिरीट कर अधिनियम या दोन्ही कायद्यांमध्ये निर्धारणेसाठी समयमर्यादेची तरतूद नव्हती. त्यासाठी १ जुलै २००४ पासून या दोन्ही कायद्यांमध्ये तशी सुधारणा केली होती. मार्च २००४ पर्यंतच्या सर्व कालावधीच्या प्रलंबित निर्धारणा तीन वर्षांत पूर्ण कराव्यात व त्यानंतरच्या कालावधीच्या निर्धारणा पूर्ण करण्यासाठीदेखील तीनच वर्षे मिळतील, असे त्या सुधारणांचे स्वरूप होते. विक्रीकर विभागांतर्गत चालू असलेल्या बदलांमुळे विहित कालावधीत या निर्धारणा पूर्ण करणे शक्य होणार नाही. म्हणून जुलै २००४ मध्ये ठरविलेली समयमर्यादा एक वर्षाने वाढविणे जरुरी आहे. त्यासाठी आवश्यक ते सुधारणाविधेयक या अधिवेशनात मांडण्यात येईल.

**करांचे दर : माफी आणि सवलती.** ६. महाराष्ट्रामध्ये मूल्यवर्धित करप्रणालीची अंमलबजावणी एप्रिल २००५ पासून सुरू झाली. वेगवेगळया वस्तूंवरील करांचे दर राष्ट्रीय सहमतीप्रमाणे ठरले आहेत. परंतु नवीन करप्रणालीची सुरुवात होण्याच्या वेळी काही वस्तूंवरील कराबाबतीत माफी आणि सवलती दिल्या होत्या. ह्यापैकी अधिक महत्वाच्या वस्तू म्हणजे गहू, तांदूळ आणि डाळी व त्यांची पिठे, मिरची, नारळ, चहा, टॉवेल आणि सोलापूरी चादर. करांच्या दरांविषयी राज्यांमध्ये राष्ट्रीय पातळीवर सहमतीने निर्णय झाले आहेत. खरे तर या वस्तूंवर कर आकारणी चालू होणे आवश्यक होते. परंतु या जीवनावश्यक वस्तूंच्या सध्याच्या वाढलेल्या किंमतींकडे मी दुर्लक्ष करू शकत नाही. सध्याच्या सवलती आणि माफी अजून सहा महिन्यांकरिता चालू रहाव्यात असे मी ठरविले आहे.

लाख, लाखेच्या कांड्या व त्यांपासून केलेले पदार्थ यांना ३१ मार्च २००७ पर्यंतच करमाफी दिली होती. आता या वस्तू कायमस्वरुपी करमुक्त करायचे मी ठरविले आहे.

**कापड प्रक्रिया.** ७. सर्वसाधारणतः कापडावर विक्रीकर लावला जात नाही. त्याऐवजी केंद्रशासन कापडउद्योगावर अतिरिक्त उत्पादनशुल्काची आकारणी करते. प्रत्यक्षात ही आकारणी कापडावरील रंगकाम, छापकाम इ. प्रक्रियांच्या संदर्भात केली जाते. राष्ट्रीय पातळीवर सहमतीने असा निर्णय झाला आहे की, जोपर्यंत कापडउद्योगातील प्रक्रियांचा अतिरिक्त उत्पादनशुल्क अधिनियमात समावेश आहे, तोपर्यंत त्या प्रक्रियांवर मूल्यवर्धित कराची आकारणी करू नये. याचा साकल्याने विचार करून मी असे ठरविले आहे की, जोपर्यंत राज्यशासनांना कापडावर मूल्यवर्धितकर लावण्याची मुभा मिळत नाही, तोपर्यत या प्रकारच्या प्रक्रियांवर मूल्यवर्धित कराची आकारणी करू नये. हा निर्णय १ एप्रिल २००५ पासून लागू होईल.

**पेट्रोल व डिझेल.** ८. पेट्रोल व डिझेलच्या किंमतीमध्ये या वित्तिय वर्षात केंद्र शासनाने कपात केली आहे. राज्य शासनानेदेखील १६ जून २००६ पासून पेट्रोल व डिझेलवरील कराचे दर अनुक्रमे २ व १ टक्क्यांनी कमी केले. त्यानंतर परत एकदा राज्य शासनाने १ डिसेंबर २००६ पासून डिझेलवरील कराचा दर ५ टक्क्यांनी कमी केला. त्याच वेळी डिझेलवर १ रुपया प्रति लिटर दराने आकारण्यात येणारा अधिभारदेखील रद्द केला. याचा एकंदरीत परिणाम म्हणून राज्यातील पेट्रोल व डिझेलची किरकोळ विक्रीची किंमत १५ जून २००६ च्या मानाने अनुक्रमे ९.५ टक्क्यांनी म्हणजे प्रति लिटर ५ रुपये ९ पैसे व १२.५ टक्क्यांनी म्हणजे प्रति लिटर ५ रुपयांनी कमी झाली आहे. सर्वसामान्यांना दिलासा मिळावा म्हणून महसुलात झळ पत्करुन सुद्धा शासनाने हा निर्णय घेतला आहे.

**केंद्रीय विक्रीकराच्या दरामध्ये घट.** ९. एखादा अपवाद वगळता भारतातील सर्व राज्यांनी स्थानिक विक्रीकराऐवजी मूल्यवर्धितकर प्रणालीची अंमलबजावणी सुरू केली आहे. परंतु आंतर-राज्यीय विक्रीवर मात्र केंद्रीय विक्रीकराची आकारणी होते. केंद्रीय विक्रीकराच्या प्रचलित

व्यवस्थेमध्ये निर्यात करणा-या राज्याला आयात करणा-या राज्यातील ग्राहकांकडून कर मिळतो. आयातदार व्यापा-याला मात्र त्याने आंतर-राज्यीय खरेदीवर भरलेल्या कराची वजावट मिळत नाही. थोडक्यात म्हणजे केंद्रीय विक्रीकराची संरचना मूल्यवर्धित करपध्दतीशी सुसंगत नाही.

ह्या विषयी राष्ट्रीय पातळीवर गेली काही वर्षे चर्चा चालू आहे. या चर्चेतून असा निर्णय झाला आहे की, आंतर-राज्यीय विक्रीवरील केंद्रीय विक्रीकराचा बोजा पूर्णपणे नाहीसा करावा. या दृष्टीने पहिले पाऊल म्हणून केंद्रशासनाने केंद्रीय विक्रीकराचा दर येत्या १ एप्रिलपासून ४% वरुन कमी करून ३% करण्याचे ठरविले आहे.

अर्थातच कराचा दर कमी केल्यामुळे सर्वच राज्यशासनांना लक्षणीय महसुली तोटा होणार आहे. महाराष्ट्र शासनाला पहिल्या वर्षी सुमारे १,००० कोटी रुपयांचा तोटा होईल असा अंदाज आहे. या नुकसानभरपाईसाठी केंद्रशासन महसूलाची अन्य साधने उपलब्ध करून देणार असून, आवश्यक असल्यास आर्थिक साहाय्य देखील देणार आहे.

महसुलाचे पहिले नवीन साधन म्हणजे तंबाखूवरील कर. राज्यशासनांना तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांवर कर लावता यावा यासाठी ‘अतिरिक्त उत्पादनशुल्क अधिनियम’ व ‘केंद्रीय विक्रीकर अधिनियम’ यामध्ये आवश्यक त्या सुधारणा सुचविणारे विधेयक लोकसभेत संमत झाले आहे. येत्या १ एप्रिल पासून महाराष्ट्र राज्यात तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांवर १२.५% दराने विक्रीकर लागू होईल. मात्र विडी आणि अनमॅन्युफॅक्चरड् तंबाखूवर विक्रीकर लावला जाणार नाही.

केंद्र व राज्य शासनाच्या विभागांना व कार्यालयांना सध्या ‘डी’ फॉर्मवर ४% या सवलतीच्या दराने आंतर-राज्यीय खरेदी

करण्याची जी मुभा आहे ती १ एप्रिल २००७ पासून रद्द होणार आहे. त्यामुळे अशा खरेदीवर शासनाला पूर्ण दराने मूल्यवर्धितकर मिळणार आहे.

याशिवाय केंद्र शासनाने ७७ विशिष्ट सेवांपुरती सेवाकराची अंमलबजावणी व त्या सेवांपासून मिळणारा महसूल राज्यशासनांच्या हवाली करण्याचे ठरविले आहे. त्यात सेवाकर लागू असणाऱ्या ३३ सेवांबरोबर ४४ नवीन सेवांचा समावेश आहे. नवीन कराच्या अंमलबजावणीच्या तयारीसाठी राज्यशासनांना काही वेळ लागणार, हे अपेक्षित आहे. त्यामुळे आणखी एक वर्ष केंद्र शासनच सदर कराची अंमलबजावणी व वसुली करेल. या ७७ सेवांपासून येणारा महसूल राज्यांमध्ये केंद्रीय विक्रीकराच्या नुकसानीच्या प्रमाणात वाटून देण्यात येईल. एक वर्षांनंतर या ७७ सेवा राज्यशासनांकडे हस्तांतरित होणार आहेत. या एक वर्षाच्या अवधीमध्ये नवीन कराच्या वसुलीसाठी यंत्रणा उभी करावी लागेल. तसेच अधिकारी व कर्मचारी यांच्या प्रशिक्षणासाठी हा अवधी वापरावा असे मी ठरविले आहे.

तसेच करचुकवेगिरीला आळा घालण्यासाठी भारताबाहेरून आयात होणा-या मालावर सीमाशुल्काच्या आकारणीच्या वेळी मूल्यवर्धितकराची आकारणी करण्याच्या प्रस्तावाला केंद्र शासनाने तत्त्वतः मान्यता दिली आहे.

या सर्व उपाययोजनानंतर महसूलहानी भरून निघाली नाही, तर केंद्रशासन प्रत्यक्ष आर्थिक साहाय्य देणार आहे

**व्यवसायकर अभययोजना.**

**१०.** व्यवसायकर अधिनियमाच्या अंमलबजावणीत असे दिसते की, नोंदीत करदात्यांकडे कर, व्याज व दंड यांची मोठी थकबाकी आहे. कर, व्याज व दंड यामध्ये काही सूट दिल्यास थकबाकीची मोठ्या प्रमाणात वसूली होऊ शकेल, असे मला वाटते. अशा करदात्यांसाठी एक अभययोजना जाहीर करण्याचे मी ठरविले आहे.

अनोंदित व्यावसायिकांना व मालकांनादेखील अभययोजनेचा लाभ घेता येईल. १ एप्रिल २००२ पासून पुढील कालावधीसाठी देय असलेली रक्कम भरली तर त्या तारखेच्या आधीच्या कालावधीसाठीची मागणी माफ करण्यात येईल. योजनेचे तपशील नंतर जाहीर करण्यात येतील.

अनोंदित करदात्यांची संख्यादेखील फार मोठी आहे. त्यांचा शोध घेऊन त्यांना नोंदीत करुन घेण्यासाठी सर्वेक्षणाची एक व्यापक मोहीम १ ऑक्टोबर २००७ पासून चालू करण्यात येणार आहे. विक्रीकर विभागाची सध्या जी पुर्नरचना चालू आहे त्याच्या ओघात सर्वेक्षणासाठी नवीन पदे निर्माण करण्याचे मी ठरविले आहे. सर्वेक्षण चालू होण्यापूर्वी अनोंदीत व्यावसायिक व मालक यांनी स्वतःहून नोंदणी करुन घेतल्यास त्यांना प्रस्तावित अभययोजनेद्वारे सवलत देण्यात येईल.

**उत्पादनशुल्काच्या रचनेतील बदल.**

**११.** देशी व भारतीय बनावटीच्या विदेशी मद्यावर किंमतीवर आधारित असलेली कररचना १९९७ पासून अंमलात आली. त्यानंतरच्या कालावधीत कररचनेत काही जुजबी बदल केले होते. मध्यंतरीच्या काळातील भाववाढ लक्षात घेऊन देशी मद्यावरील उत्पादनशुल्काचे दर बदलणे उचित ठरेल. सध्या देशी मद्यावर उत्पादनशुल्काचा किमान दर प्रती प्रूफ लिटरसाठी ५५ रुपये इतका आहे. नवीन किमान दर प्रती प्रूफ लिटरसाठी ६० रूपये असेल.

उत्पादनशुल्क आकारणीच्या प्रचलित पद्धतीप्रमाणे किरकोळ विक्रीची कमाल किंमत आणि निर्मितीमूल्य यांची सांगड घातलेली असते. सध्या भारतीय बनावटीच्या विदेशी मद्याचे निर्मिती मूल्य प्रति लिटर ८८ रुपयांपर्यंत असेल तर, नागरी उपयोगासाठी, किरकोळ विक्रीची कमाल किंमत निर्मिती मुल्याच्या चौपट असते. मी आता ठरविले आहे की, या मद्याचे निर्मितीमूल्य प्रति

लिटर ९२ रुपयांपर्यंत असेल अशा सर्व प्रकरणी त्याच्या किरकोळ विक्रीची कमाल किंमत निर्मितीमूल्याच्या चौपट असावी. कॅंटीन स्टोअर विभागाला जी विक्री होते त्यासाठी याच अनुरोधाने बदल 'करण्यात येतील.

फर्मेटेड बिअरच्या बाबतीत [किण्वित बिअर] उत्पादन शुल्क निर्मिती मूल्याइतकेच असते. तर किरकोळ विक्रीची कमाल किंमत निर्मिती मूल्याच्या साडेतीन पट असते. किरकोळ विक्रीची कमाल किंमत बदलण्याचा माझा मानस नाही. पण आता फर्मेटेड बीअर वरील उत्पादन शुल्क निर्मितीमूल्याच्या सव्वा पट असेल.

उत्पादन शुल्क अधिनियमाखालील सर्व बदल १ एप्रिल २००७ पासून अंमलात येतील.

**मुद्रांक शुल्काबाबत स्पष्टीकरण**

**१२.** भांडवली बाजारातील व वस्तूबाजारातील व्यवहार आता संगणकीय प्रणालीद्वारे होतात. काही वेळा दलाल आणि खरेदीदार हे दोघेही राज्याबाहेरचे असतात. अशा परिस्थितीमध्ये भांडवली बाजारातील व्यवहारांवर मुद्रांकशुल्क आकारले जाणार नाही, असे मी मागील वर्षी जाहीर केले होते. वास्तविक पाहता वस्तूबाजाराच्या बाबतीत देखील नेमकी हीच अडचण येते. त्यामुळे वस्तूबाजाराच्या बाबतीतदेखील तीच सवलत, भांडवलीबाजाराला ज्या तारखेपासून सवलत दिली त्याच तारखेपासून पूर्वलक्षी प्रभावाने लागू करायचे मी ठरविले आहे.

जय हिंद ! जय महाराष्ट्र !!